MARATHWADA MITRA MANDAL'S
# COLLEGE OF COMMERCE
Affiliated to Savitribai Phule Pune University, Re-Accredited by NAAC with "A" Grade
ISO 9001:2015 Certified, Awarded as Best College by Savitribai Phule Pune University
202/A, Deccan Gymkhana, Pune – 411004
principal@mmcc.edu.in, enquiry@mmcc.edu.in, www.mmcc.edu.in

"येथे बहुतांचे हित"

# शुभम, साध्वी धुरीची चमक

## आंतरविद्यापीठ जलतरण

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठच्या साध्वी धुरी हिने आंतरविद्यापीठ जलतरण स्पर्धेत एकूण सहा पदकांची कमाई केली. अर्थात, तिला सुवर्णयशाने हुलकावणी दिली. पुणे विद्यापीठाने या स्पर्धेत एक सुवर्ण, पाच रौप्य आणि चार ब्राँझपदके मिळवली.

ओडिशा येथे ही स्पर्धा झाली. या स्पर्धेत साध्वीने ५०, १०० आणि २०० मीटर फ्रीस्टाइलमध्ये रौप्य, तर ५० मीटर बटरफ्लाय, १०० मीटर बटरफ्लाय आणि २०० मीटर वैयक्तिक मिडले प्रकारात ब्राँझपदक मिळवले. साध्वीने ५० मीटर फ्रीस्टाइलमध्ये २८.३९ सेकंद, १०० मीटर फ्रीस्टाइलमध्ये १ मिनिट ०२.१८ सेकंद, तर २०० मीटर फ्रीस्टाइलमध्ये २ मिनिटे १९.५५ सेकंद वेळ नोंदवून दुसरा क्रमांक मिळवला. साध्वीने ५० मीटर बटरफ्लायमध्ये ३०.३८ सेकंद, तर १०० मीटर बटरफ्लायमध्ये १ मिनिट १०.५१ सेकंद वेळ नोंदवून तिसरा क्रमांक मिळवला. यानंतर साध्वीने २०० मीटर वैयक्तिक मिडले प्रकारात २ मिनिटे ३८.७१ सेकंद वेळ नोंदवून ब्राँझपदक पटकावले.


शुभम


साध्वी

वैयक्तिक प्रकारात पुणे विद्यापीठच्या शुभम धायगुडे याने एक सुवर्ण आणि एक रौप्यपदकाची कमाई केली. शुभमने १५०० मीटर फ्रीस्टाइल प्रकारात १७ मिनिटे ३४.०० सेकंद वेळ नोंदवून पुणे विद्यापीठाच्या खात्यात सुवर्णपदक जमा केले. यानंतर शुभमने ४०० मीटर फ्रीस्टाइलमध्ये ४ मिनिटे २२.४४ सेकंद वेळ नोंदवून दुसरा क्रमांक पटकावला.

यानंतर ४ बाय २०० मीटर फ्रीस्टाइल रिलेमध्ये पुणे विद्यापीठाने ब्राँझपदक मिळवले. यात श्वेजल मानकर, शुभम धायगुडे, प्रसाद कंदुल, प्रथमेश सोनार यांचा समावेश होता. श्वेजल मानकरने (२९.९५ से.) ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोकमध्ये रौप्यपदक पटकावले. या स्पर्धेसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संघास स्वोजस गोडसे यांचे मार्गदर्शन लाभले, तर अभिजित गर्ग हे व्यवस्थापक म्हणून संघासोबत होते.

**Media coverage of Ms. Sadhvi Dhuri winning 6 prizes in Inter University Swimming Competition published in Maharashtra Times dated, 27th December, 2021**

Scanned with OKEN Scanner

# गुरवीरसिंगच्या हॅट्ट्रिकसह सहा विकेट



गुरवीरसिंग

## » डेव्हिड करंडक क्रिकेट

पुणे, ता. २१ : पुणे शहर विभागाच्या आंतर-महाविद्यालयीन डेव्हिड करंडक क्रिकेट स्पर्धेत एमएमसीसी संघाने एआयएसएसएमएसच्या कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग संघाचा १४२ धावांनी पराभव केला त्यात महत्त्वाचा वाटा गुरवीरसिंगने हॅटट्रिकसह मिळवलेल्या सहा विकेटचा होता.

प्रथम फलंदाजी करताना 'एमएमसीसी'ने चार बाद २०५ धावा केल्या. त्यात कुणालने ५३, तर निकुंज बी. याने ४७ धावांची खेळी केली. प्रत्युत्तर देताना 'एआयएसएसएमएस' कॉलेज ऑफ इंजिनीअरिंगचा डाव गुरवीरसिंगच्या अचूक माऱ्यासमोर ६३ धावांत संपुष्टात आला. त्याने केवळ पाच धावा देऊन हॅटट्रिकसह सहा गडी बाद केले.

**संक्षिप्त धावफलक :**

एमएमसीसी : ४ बाद २०५ (कुणाल ५३, निकुंज बी. ४७, हर्ष पालो नाबाद ३४, अद्वैत मुळ्ये २४, अभिषेक इंगळे २-१८, अंकुर सुरवसे १-३७) विजयी विरुद्ध एआयएसएसएमएस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग : (१६ षटकांत) सर्वबाद ६३ (विजय टी. ३२, गुरवीरसिंग ६-५ हॅटट्रिकसह, प्राज्वल गुंड १-१, यश माने १-८, यश खळदकर १-१५, ).

**Newspaper Clipping of MMCC Cricket Team winning Intercollegiate "David Karandak Cricket" published in the newspaper -Sakal dated 22nd December 2021.**

Scanned with OKEN Scanner

## » डेव्हिड करंडक क्रिकेट

# यश खळदकरच्या वीस धावांत पाच विकेट



यश खळदकर

पुणे, ता. २४ : पुणे शहर विभागाच्या आंतर-महाविद्यालयीन गटाच्या डेव्हिड करंडक क्रिकेट स्पर्धेत मराठवाडा मित्रमंडळ कॉलेज ऑफ कॉमर्स (एमएमसीसी) संघाने औंधच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेजवर ४७ धावांनी विजय प्राप्त करीत उपांत्यपूर्व फेरी गाठली.

फर्ग्युसन कॉलेजच्या मैदानावरील लढतीत प्रथम फलंदाजी करताना एमएमसीसीने नऊ बाद १४९ धावा केल्या. यावेळी यश माने व सलामीवीर अद्वैत मुळेने सुरेख खेळ केला. यश खळदकरने पाच गडी बाद करताना केलेल्या अचूक गोलंदाजीपुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेजचा डाव १०२ धावांत आटोपला. यावेळी शुभम शिंदेने केलेली ६० धावांची खेळी अपुरी पडली.

**संक्षिप्त धावफलक :**

एमएमसीसी – (१८ षटकांत) ९ बाद १४९ (यश माने ४५, अद्वैत मुळे ३१, कुणाल पराशर २०, अल्पेश खराडे ४-३२) पराभूत विरुद्ध डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज, औंध – (१४.१ षटकांत) सर्वबाद १०२ (शुभम शिंदे ६०, यश खळदकर ५-२०, अद्वैत मुळे २-९, प्रज्वल गुंड २-२०, गुरूविरसिंग १-१०).

**Media coverage of MMCC Cricket Team winning Intercollegiate "David Karandak Cricket" published in the newspaper -Sakal dated 25th December 2021.**

Scanned with OKEN Scanner




**Ms. Sadhvi Dhuri has won Silver medal in All India Inter University Aquatics (M & W) 2021-22 held in Orisha, 22nd – 26th December, 2021**




**Rishabha Deshpande with his team as a winner in Inter University Badminton championship held in Chandigarh University, Mohali during the A.Y. 2021-22.**

Scanned with OKEN Scanner




**Rishabha Deshpande has won Silver Medal in Senior Inter District Badminton championship held in Thane**

Scanned with OKEN Scanner




**Rishabha Deshpande has won Silver medal in Badminton in Inter University Badminton championship held in Chandigarh**

Scanned with OKEN Scanner